सन्माननीय सदस्य तसेच खाजगी व्यक्ती यांनी केलेल्या विनंतीनुसार सभागृहातील कार्यवाहीचे दृक-श्रव्य मुद्रण (**Audio-Video Recordings**) यांच्या सीडीज् / डिव्हीडीज् पुरवितांना अनुसरावयाची मार्गदर्शक तत्त्वे...

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
क्रमांक :१६९४२/ क-१,
दिनांक :१२एप्रिल, २०१३.

:: ज्ञा प न ::

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन्माननीय सदस्य तसेच खाजगी व्यक्तींकडून सभागृहातील कार्यवाहीचे (Proceeding of the House) दृक-श्रव्य मुद्रण (Audio-Video Recordings) यांच्या सीडीज् / डिव्हीडीज् (यापुढे ज्याचा उल्लेख सीडीज् / डिव्हीडीज् असा करण्यात आला आहे) पुरविण्याबाबत वेळोवेळी विनंती करण्यात येते. या स्वरुपाच्या विनंतीच्या अनुषंगाने सभागृहातील कार्यवाहीच्या सीडीज् / डिव्हीडीज् पुरविण्याचा निर्णय मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी घेतलेला आहे. **सभागृहातील भाषणाची प्रत पुरविण्यासंदर्भात महाराष्ट्र विधानपरिषद नियम २८३ च्या पोट-नियम (१), (२) व (३) तसेच महाराष्ट्र विधानसभा नियम ३१५ च्या पोट-नियम (१), (२) व (३) मध्ये तरतुद करण्यात आली आहे. सदरहू नियमांतील तरतूदी या संबंधित सभागृहातील कार्यवाहीच्या ऑडीओ-व्हिडीओ सीडीज् / डिव्हीडीज् पुरविण्यासंदर्भात लागू राहतील.** या व्यतिरिक्त सीडीज् / डिव्हीडीज् पुरविण्यासंदर्भात खालीलप्रमाणे मार्गदशंक तत्त्वे विहित करण्यात येत आहेत :-

:: मार्गदर्शक तत्त्वे ::

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या परवानगीने विधानपरिषद सभागृहातील व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या परवानगीने विधानसभा सभागृहातील कार्यवाहीच्या सीडीज् / डिव्हीडीज् पुरविण्याची व्यवस्था करण्यात येईल. त्याकरिता अर्जदार व्यक्तीने आवश्यक त्या वैयक्तिक तपशीलांसह प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्याकडे रितसर अर्ज सादर करणे आवश्यक राहिल.

२) सीडीज् / डिव्हीडीज् ज्या उद्देशासाठी हव्या आहेत, त्या उद्देशाचा स्पष्ट उल्लेख अर्जदाराने त्यांच्या अर्जात नमूद करणे आवश्यक राहिल.

३) विधानमंडळ सचिवालयाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या दरानुसार सीडीज् / डिव्हीडीज् पुरविल्या जातील.

४) लेखी अभिलेख्याशी अनुरुप राहिल यादृष्टीने, कार्यवाही संपादक हे यथास्थिती मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद वा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी नाकारलेल्या कार्यवाहीचा भाग अथवा विलोपित भाग (Expunged portion) मूळ सीडीज् / डिव्हीडीज् मधून काढून टाकतील.

..२/-

५) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद वा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांची यथास्थिती पूर्व अनुमती असल्याखेरीज अर्जदारास सभागृहाच्या कार्यवृत्ताच्या सीडीज् / डिव्हीडीज् कोणत्याही न्यायालयापुढे किंवा कोणत्याही इतर प्राधिकाऱ्यापुढे सादर करता येणार नाहीत.

६) सभागृहाच्या कार्यवाहीचे दृक-श्रव्य मुद्रण (Audio-Video Recording) यांचा उपयोग अर्जदार व्यक्तीकडून केवळ वैयक्तिक वापर / संदर्भ या उद्देशांसाठीच सामान्यपणे करण्यात येईल. असे करतांना खालील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील :-

(अ) सभागृहाच्या कार्यवाहीचे योग्य प्रकारे / अचूकपणे वृत्त देण्यात यावे ;

(ब) उपहास किंवा कुचेष्टा करण्यासाठी दृक-श्रव्य मुद्रणांचा वापर करु नये ;

(क) कोणत्याही राजकीय पक्षाची जाहिरात, निवडणूक प्रचार किंवा व्यावसायिक जाहिरातीसाठी दृक-श्रव्य मुद्रणांचा वापर करता येणार नाही ; आणि

(ड) कोणतीही अभिकरणे / वाहिन्या यांना दृक-श्रव्य मुद्रण पुरविता येणार नाही.

७) उपरोल्लेखित अटींचा भंग किंवा उल्लंघन केल्यास अर्जदार विशेषाधिकार भंगाच्या कारवाईस पात्र ठरु शकेल.

८) सभागृहातील कार्यवाहीच्या दृक-श्रव्य मुद्रणाच्या सीडीज् / डिव्हीडीज् उपलब्ध करुन देण्यासाठी विधानमंडळ सचिवालयाने वेळोवेळी ठरविलेल्या रकमेचे संपूर्ण प्रदान कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई यांच्या नावे काढण्यात आलेल्या दर्शनी धनाकर्षाद्वारे किंवा बँकेचा धनादेश किंवा रोख रकमेच्या स्वरुपात तिची योग्य पावती देऊन किंवा मनी ऑर्डरद्वारे करण्यात येईल.

९) सभागृहाच्या कार्यवाहीच्या सीडीज् / डिव्हीडीज् यांच्यासाठी अर्ज करताना अर्जदाराला खालील लेखी हमी द्यावी लागेल.

:: हमी ::

१) मी / आम्ही, विधानमंडळ सचिवालयाने विहित केलेल्या खालील अटी आणि शर्तीचे पालन करु.

अ) सभागृहातील कार्यवाहीच्या सीडीज् / डिव्हीडीज्चा वापर उचित कारणासाठीच करेन.

ब) उपहास किंवा कुचेष्टा करण्यासाठी सीडीज् / डिव्हीडीज् यांचा वापर करणार नाही.

क) दृक-श्रव्य मुद्रणांचा वापर हा मी / आम्ही वैयक्तीक वापर वा संदर्भ याकरताच मर्यादित ठेवेन / ठेऊ. कोणत्याही राजकीय पक्षाची जाहिरात, निवडणूक प्रचार, व्यावसायिक जाहिरात, न्यायालय किंवा प्राधिकरणापुढे सदरहू मुद्रणांचा वापर करणार नाही.

..३/-

ड) कोणतीही इतर अभिकरणे / वाहिन्या यांना सदरहू मुद्रणे पुरविणार नाही ; आणि

ई) उपरोल्लेखित अटींचा भंग किंवा उल्लंघन मी / आम्ही करणार नाही.

२) सभागृहातील कार्यवाहीच्या सीडीज् / डिव्हीडीज्चा वापर करताना त्या संदर्भातील कोणत्याही क्षतिग्रस्त पक्षाने (aggrieved party) तक्रार केल्यास विधानमंडळ सचिवालयाने यासंदर्भात घेतलेला निर्णय अंतिम आणि बंधनकारक असेल.

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन्माननीय सदस्य तसेच खाजगी व्यक्ती यांनी सभागृहातील कार्यवाहीच्या दृक-श्रव्य मुद्रण पुरविण्याबाबत विनंती केल्यास विधानपरिषद / विधानसभा नियमातील संबंधित तरतूदी, उपरोक्त मार्गदर्शक तत्त्वे व हमी यांच्या अधीन राहून त्यांना ते उपलब्ध करुन देता येईल. तथापि, अशाप्रकारची विनंती मान्य / अमान्य करण्याचा मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद / मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

सदरहू ज्ञापनान्वये अनुसरायाची कार्यपध्दती ही सन २०१३ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन कालावधीपासून अंमलात येईल.

आदेशानुसार,

( शिवदर्शन साठ्ये )
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति,

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

४) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) या सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.

६) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) निवडसूची.